21 JAN 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सीमा बांधवांच्या लेकरांना शिवाजी विद्यापीठाचे बळ

वैभव गोंधळी

**कोल्हापूर :** महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठी शिवाजी विद्यापीठामध्ये उच्चशिक्षणासाठी मोफत प्रवेश योजना राबवली जात आहे. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून ही प्रवेश योजना लागू करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाने दावा केलेल्या सीमाभागातील मराठी भाषिक विद्यार्थ्यांसाठी शिवाजी विद्यापीठाने ही योजना सुरू केली आहे. बेळगाव, बिदर, भालकीसह ८६५ गावांतील विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण मिळणार आहे.

गेल्या ७० वर्षांपासून महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद सुरू आहे. सीमाभागातील ८६५ गावे महाराष्ट्रामध्ये यावीत यासाठी



सातत्याने सीमाभागातील बांधवासह महाराष्ट्र सरकार विविध पातळ्यांवर लढा देत आहे. कानडी वरवंट्याखाली भरडल्या जाणाऱ्या सीमाभागातील विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणासाठी शिवाजी विद्यापीठाने पुढाकार घेतला आहे. या गावांतील विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठाने मोफत वसतिगृह उपलब्ध करून दिले आहे. सीमाभागातील विद्यार्थ्यांने अनुदानित अभ्यासक्रमास प्रवेश घेतल्यास त्याची ट्यूशन फी घेतली जाणार नाही. विनाअनुदानित अभ्यासक्रमास प्रवेश घेतल्यास ट्यूशन फीमध्ये २५ टक्के सवलत देण्यात येत आहे. विद्यापीठामध्ये सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठी प्रवेशासाठी एकूण प्रवेश क्षमतेच्या १० टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. सीमाभागातील विद्यार्थ्यांना या उपक्रमांतर्गत पीएचडीसाठी प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना ३ वर्ष मोफत वसतिगृहाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

## पहिल्या वर्षी ५९ प्रवेश

शिवाजी विद्यापीठातर्फे २०२२-२३ या शैक्षणिक वर्षापासून ही प्रवेश योजना राबवण्यास सुरुवात करण्यात आली. या पहिल्या शैक्षणिक वर्षात विविध अभ्यासक्रमांसाठी सीमाभागातील एकूण ५९ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. पुढील वर्षात प्रवेश संख्येमध्ये मोठी वाढ होईल, अशी विद्यापीठ प्रशासनाची अपेक्षा आहे.

सीमाभागातील अधिकाधिक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणा मिळावे, यासाठी शिवाजी विद्यापीठातर्फे हे विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांना या योजनेची माहिती द्यावी तसेच त्यांना उच्चशिक्षणाच्या प्रवेशासाठी अधिक प्रोत्साहित करण्यासाठी विद्यापीठाची प्रवेश समिती कार्यरत आहे. विद्यापीठातील दोन प्राध्यापक विद्यार्थ्यांना प्रवेशाची माहिती देण्याबरोबर त्यांना प्रवेशासाठी प्रोत्साहित करण्याचे काम करीत आहेत.

21 JAN 2023 तरुण भारत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गोशिमा सबक्लस्टरबरोबर शिवाजी विद्यापीठाचा सामंजस्य करार

## प्रशिक्षण, कौशल्य विकास आणि संशोधनात एकत्रित काम करणार

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ व गोशिमा सबक्लस्टर यांच्यामध्ये प्रशिक्षण, कौशल्य विकास आणि संशोधन या क्षेत्रात एकत्र काम करण्याच्या दृष्टीने सामंजस्य करार करण्यात आला आहे.

या करारांतर्गत विद्यार्थी केंद्रित प्रशिक्षण व कौशल्य आधारित अभ्यासक्रम, उद्योगाशी निगडित कार्यशाळा, उद्योग समस्या निर्गमित करण्याकरीता विविध संशोधन प्रकल्प, शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम, संशोधनाकरीता विविध शासकीय शिखर संस्थांकडे संशोधन प्रकल्पाच्या माध्यमातून आर्थिक मदत घेणे, पेटंटबाबत मार्गदर्शन आणि विशिष्ट समस्या सोडविण्याशी संबंधित उपायांशी स्टार्टअप किंवा स्पिनऑफ कंपनी स्थापन करणे असे उपक्रम हाती घेणार आहे. यावेळी कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी हा सामंजस्य करार विद्यार्थी, शिक्षक यांच्यासाठी महत्त्वाचा असून त्या अंतर्गत



**कोल्हापूर : गोशिमा क्लस्टर आणि शिवाजी विद्यापीठ यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी डॉ. एस. डी. डेळेकर, रणजित मोरे, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, सचिन शिरगावकर, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. व्ही. एन. शिंदे, मोहन पंडितराव, अजित आजरी.**

विद्यार्थी व शिक्षक हे तांत्रिक व उद्योगाशी निगडित नवनवीन ज्ञान निश्चितच अवगत करतील, असा विश्वास व्यक्त केला. प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील यांनी या सामंजस्य कराराअंतर्गत उद्योजकांनी विद्यापीठातील अत्याधुनिक उपकरणांचा वापर करून उत्पादनांची गुणवत्ता वाढवावीत, असे सुचविले. आयआयएफचे अध्यक्ष सचिन शिरगावकर यांनी शिक्षकांच्या उन्नतीकरिता विविध कोर्सेस तयार करून ते विद्यापीठातील शिक्षकांना उपलब्ध करून देणार असल्याचे सांगितले. मोहन पंडितराव म्हणाले या करारामुळे कोल्हापूर उद्योग जगताला प्रशिक्षित कर्मचारी उपलब्ध होतील.

सूत्रसंचालन विद्यापीठ उद्योग कक्षाचे समन्वयक डॉ. एस. डी. डेळेकर यांनी केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. या कार्यक्रमास डॉ. एस. एच. ठकार, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. के. डी. सोनवणे, अजित आजरी, रणजित मोरे, अमोल यादव, विजय वसगडे, श्रीनिवास जोशी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
21 JAN 2023 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ व गोशिमा सबक्लस्टर यांच्यातील सामंजस्य कराराप्रसंगी सचिन शिरगावकर, डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. पी. एस. पाटील, व्ही. एन. शिंदे आदी.

# शिवाजी विद्यापीठ-गोशिमा यांच्यात करार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ व गोशिमा सब क्लस्टर यांच्यामध्ये शुक्रवारी सामंजस्य करार करण्यात आला. या करारांतर्गत प्रशिक्षण, कौशल्य विकास आणि संशोधन क्षेत्रात एकत्र काम करण्याच्या दृष्टीने हा करार करण्यात आला आहे.

सामंजस्य करारांतर्गत विद्यार्थी केंद्रित प्रशिक्षण व कौशल्य आधारित अभ्यासक्रम, उद्योगाशी निगडित कार्यशाळा, विविध संशोधन प्रकल्प, शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम, पेटंटबाबत मार्गदर्शन आणि विशिष्ट समस्या सोडवण्याशी संबंधित अनोख्या उपायांशी संबंधित स्टार्ट-अप किंवा स्पिन-ऑफ कंपनी स्थापन करणे असे उपक्रम हाती घेण्याचे आयोजन केले आहे. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी हा सामंजस्य करार विद्यार्थी व शिक्षक यांच्यासाठी महत्त्वाचा असून त्या अंतर्गत विद्यार्थी व शिक्षक हे तांत्रिक व उद्योगाशी निगडित नवनवीन ज्ञान निश्चितच अवगत करतील, असा विश्वास व्यक्त केला. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, सचिन शिरगावकर, मोहन पंडितराव यांनी मते मांडली. सूत्रसंचालन डॉ. एस. डी. डेळेकर यांनी केले, तर प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. एस. एच. ठकार, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. के. डी. सोनवणे तसेच गोशिमा सब क्लस्टरतर्फे अजित आजरी, रणजित मोरे, अमोल यादव, विजय वसगडे, श्रीनिवास जोशी उपस्थित होते.

सकाळ



कोल्हापूर : सामंजस्य कराराप्रसंगी डावीकडून डॉ. एस. डी. डेळेकर, रणजित मोरे, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, सचिन शिरगावकर, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. व्ही. एन. शिंदे, मोहन पंडितराव, अजित आजरी.

# शिवाजी विद्यापीठ, गोशिमा यांच्यात सामंजस्य करार

कोल्हापूर, ता. २० : शिवाजी विद्यापीठ व गोशिमा सब क्लस्टर यांच्यात प्रशिक्षण, कौशल्य विकास आणि संशोधन क्षेत्रात एकत्र काम करण्याच्या दृष्टीने सामंजस्य करार झाला.

करारांतर्गत विविध उपक्रम हाती घेण्यात येणार आहेत.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी विद्यार्थी व शिक्षक तांत्रिक व उद्योगाशी निगडित नवनवीन ज्ञान निश्चितच अवगत करतील, असा विश्वास व्यक्त केला. प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील यांनी करारांतर्गत उद्योजकांनी विद्यापीठातील अत्याधुनिक उपकरणांचा वापर करून त्यांनी उत्पादनांची गुणवत्ता वाढवावी, असे सुचविले.

आयआयएफचे अध्यक्ष सचिन शिरगावकर यांनी गोशिमात सुरू असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. तसेच आगामी काळात शिक्षकांच्या उन्नतीकरिता विविध कोर्सेस तयार करून ते विद्यापीठातील शिक्षकांना उपलब्ध करून देणार असल्याचे सांगितले. डॉ. एस. एच. ठकार, प्रा. डॉ. पी. डी. राऊत, डॉ. के. डी. सोनवणे, अजित आजरी, रणजित मोरे, अमोल यादव, विजय वसगडे, श्रीनिवास जोशी उपस्थित होते.

मोहन पंडितराव यांनी कराराबद्दल विद्यापीठातील सर्व अधिकारी, गोशिमा सबक्लस्टरच्या सभासदांचे आभार मानले. डॉ. एस. डी. डेळेकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

पुढारी


# शिवाजी विद्यापीठ - 'गोशिमा' सबक्लस्टर यांच्यात सामंजस्य करार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ व गोशिमा सबक्लस्टर यांचेमध्ये प्रशिक्षण, कौशल्य विकास आणि संशोधन या क्षेत्रात एकत्र काम करण्याच्या दृष्टीने सामंजस्य करार करण्यात आला. या सामंजस्य करारांतर्गत विद्यार्थीकेंद्रित प्रशिक्षण व कौशल्य आधारित अभ्यासक्रम, उद्योगाशी निगडित कार्यशाळा, उद्योग समस्या निर्गमित करण्याकरिता विविध संशोधन प्रकल्प, शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम, संशोधनाकरिता विविध शासकीय शिखर संस्थांकडे संशोधन प्रकल्पाच्या माध्यमातून आर्थिक मदत घेणे, पेटंटबाबत मार्गदर्शन आणि विशिष्ट समस्या सोडविण्याशी संबंधित अनोख्या उपायांशी संबंधित स्टार्टअप किंवा स्पिन ऑफ कंपनी स्थापन करणे इत्यादी उपक्रम हाती घेण्याचे आयोजन केले आहे.

तरूण भारत

# जलपुरूष डॉ. राजेंद्रसिंग यांचे आज शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात आज शनिवारी (दि. २१) जलपुरूष डॉ. राजेंद्रसिंग राणा यांच्या



व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. पंचगंगा : पूर आणि प्रदूषण असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय आहे. दुपारी ४.१५ वाजता विद्यापीठातील सिनेट हॉलमध्ये हे व्याख्यान होणार आहे. शिवाजी विद्यापीठ आणि असोसिएशन ऑफ आर्किटेक्टस् अँड इंजिनिअर्स यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या व्याख्यानाचे अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के भूषविणार आहेत. यावेळी या दोन्ही दोन्ही संस्थांत सामंजस्य कराराही होणार आहे. डॉ. राजेंद्र सिंह राणा यांची नुकतीच (सप्टेंबर २०२२) जागतिक पातळीवरील 'दुष्काळ अणि महापूर संबंधित जागतिक जन आयोग" या संघटनेच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे. त्या पार्श्वभूमीवर डॉ. राजेंद्र सिंह हे पहिल्यांदाच कोल्हापूरमध्ये येत आहेत.

पुढारी

# विद्यापीठात आज डॉ. राजेंद्र सिंह राणा यांच्या मार्गदर्शनपर चर्चासत्राचे आयोजन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ व असोसिएशन ऑफ आर्किटेक्टस् अँड इंजिनिअर्स यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार (दि.२१) रोजी दुपारी चार वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सिनेट हॉलमध्ये जलपुरुष डॉ. राजेंद्र सिंह राणा यांचे 'पंचगंगा- पूर आणि प्रदूषण' या विषयावर मार्गदर्शनपर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

याप्रसंगी दोन्ही संस्थांमध्ये सामंजस्य करार करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असणार आहेत. दोन्ही संस्थांतर्फे विविध क्षेत्रांतील प्रत्यक्ष माहिती, ज्ञान मिळवून देणे व त्यादृष्टीने विविध उपक्रम हाती घेऊन नियोजन करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. दोन्ही संस्थांच्या वतीने एकत्रितरीत्या अशा प्रकारच्या उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

डॉ. राजेंद्र सिंह राणा यांची नुकतीच (सप्टेंबर २०२२) जागतिक पातळीवरील 'दुष्काळ आणि महापूर संबंधित जागतिक जन आयोग' संघटनेच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे. त्या पार्श्वभूमीवर डॉ. राजेंद्र सिंह पहिल्यांदाच कोल्हापूरमध्ये येत आहेत. चर्चासत्रात पंचगंगा नदीच्या पूर व प्रदूषणाबाबत माहिती जाणून घेऊन जागतिक पातळीवरील उपाययोजनांची माहिती देणार आहेत.

लोकमत

■ व्याख्यान : शिवाजी विद्यापीठ व आर्किटेक्चर असोसिएशन यांच्या वतीने 'पंचगंगा महापूर व प्रदूषण' या विषयावर जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्रसिंह यांचे व्याख्यान, स्थळ -सिनेट हॉल, वेळ - दुपारी ४.१५ वाजता.

# जलतज्ज्ञ राजेंद्रसिंह आज विद्यापीठात

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ आणि असोसिएशन ऑफ आर्किटेक्टस् अँड इंजिनीअर्सतर्फे जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्रसिंह राणा यांचे 'पंचगंगा- पूर आणि प्रदूषण' या विषयावर आज शनिवारी, दुपारी ४.१५ वाजता शिवाजी विद्यापीठात सिनेट हॉलमध्ये चर्चासत्र होत आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आहेत. यावेळी विद्यापीठ आणि असोसिएशन ऑफ आर्किटेक्टयांच्यामध्ये सामंजस्य करार केला जाणार आहे.

सकाळ



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात मंगळवारी मराठी भाषा पंधरावड्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात लेखक कृष्णात खोत यांच्याशी डॉ. रणधीर शिंदे यांनी संवाद साधला. शेजारी गोमटेश्वर पाटील.

# वाचन हाच लेखकाचा रियाज : कृष्णात खोत

## शिवाजी विद्यापीठात लेखक संवाद कार्यक्रम

कोल्हापूर, ता. २० : वाचन हाच लेखकाचा रियाज असतो, असे मत लेखक कृष्णात खोत यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागातर्फे मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमित्त आयोजित लेखक संवाद कार्यक्रमात ते बोलत होतो. मराठी विभागातील प्रा. डॉ. रणधीर शिंदे, महावीर महाविद्यालयातील प्रा. डॉ. गोमटेश्वर पाटील यांनी खोत यांच्याशी संवाद साधला. लेखन प्रक्रियेतील टप्पे, कादंबरी आशय यासंबंधी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे त्यांनी अतिशय तटस्थपणे दिली.

समकाळापेक्षा गतकालीन सांस्कृतिक संचित, निसर्ग, मानवी जीवनानुभव यावर आधारित कल्पिलेले साहित्य हे मला व्यक्तिगत महत्त्वपूर्ण वाटते अशी भूमिका त्यांच्या संवादातून जाणवली. प्रा. नीला जोशी, शरद गायकवाड, अरुण शिंदे, प्रदीप पाटील उपस्थित होते. संशोधक विद्यार्थी राजेश पाटील यांनी परिचय करून दिला. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले.

पुढारी

# मन, बुद्धीच्या समन्वयातून युवकांनी सर्वांगीण विकास साधावा : सोयम

कोल्हापूर : सर्वांगीण विकासासाठी युवकांनी मन आणि बुद्धीच्या विकासाचा ध्यास धरावा. निसर्गातील सार्वजनिक बाबी माझ्या आहेत. निसर्गावर होणारा अत्याचार थांबवा. युवकांना आधुनिक तंत्रज्ञान विकासाची दिशा दाखवत आहे. स्वतः झिजण्यासाठी युवकांनी तयार राहावे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव विलास सोयम यांनी केले. महावीर महाविद्यालयाच्या श्रमसंस्कार शिबिराच्या उद्‌घाटनप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थावरून प्राचार्य डॉ. श्रीधर हेरवाडे म्हणाले, ग्रामीण युवकांची अस्मिता, ऊर्जा जागवण्यासाठी अशा श्रमसंस्कार शिबिराची खूप गरज आहे. यावेळी प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखंडे, प्रा. जयवंत दळवी, सांगवडे गावचे सरपंच रूपाली कुंभार, उपसरपंच सचिन माने, ग्रामविकास अधिकारी सारिका बंडगर उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. रविदास पाडवी यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ. अंकुश बनसोडे करून दिला. सूत्रसंचालन श्रावणी शंकरदास यांनी केले. प्रा.सुनील चौगुले यांनी आभार मानले.

पुढारी

# अर्जुन मोंगलेला बॉडी बिल्डिंग स्पर्धेत सुवर्ण

**हातकणंगले : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अंतर्गत झालेल्या बॉडी बिल्डिंग स्पर्धेत हातकणंगलेचा अर्जुन मोंगले याने प्रथम क्रमांक पटकावून सुवर्णपदक मिळवले. गेल्या वर्षी झालेल्या ज्युनिअर महाराष्ट्र श्री -२०२२ मध्येही सुवर्णपदक पटकावले होते. त्याची ऑल इंडिया युनिव्हर्सिटी राष्ट्रीय पातळीवर निवड झाली आहे. अर्जुन मोंगले हा सर्वसामान्य कुटुंबातील असून आण्णा साहेब डांगे महाविद्यालयमध्ये बी. कॉम.चे शिक्षण घेत आहे. त्याला नागेश सुतार यांचे मार्गदर्शन मिळाले. तर रमेश पाटील, आई - वडील यांचे प्रोत्साहन लाभले.



पुण्यनगरी

# शरीरसौष्ठव स्पर्धेत अर्जुन मोंगले प्रथम

**हातकणंगले :** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अंतर्गत झालेल्या बॉडी बिल्डिग स्पर्धेत हातकणंगलेच्या अर्जुन मोंगले याने प्रथम क्रमांक पटकवून गोल्ड मेडल मिळवले. अर्जुन हा सर्वसामान्य कुटुंबातील असून आण्णासाहेब डांगे महाविद्यालयमध्ये बी.कॉम.चे शिक्षण घेत आहे. घरची परिस्थिती बेताची असल्याने उदरनिर्वाहसाठी तो पानटपरीचा व्यवसाय करतो. बॉडी बिल्डिंगची आवड असल्याने बाबूजमाल तालीम मंडळ येथे सराव सुरू केला. नंतर इचलकरंजीच्या नागेश सुतार, तसेच माजी उपनगराध्यक्ष रणजित धनगर, रमेश पाटील यांचेही मार्गदर्शन मिळाले.

पुण्यनगरी

# सेंद्रिय शेती काळाची गरज आहे : डॉ. शिंदे

**कागल :** अन्न, पाणी, हवा या मानवाच्या मूलभूत गरजा आहेत. त्या निसर्गातूनच मिळतात; पण मानवाला त्याची जाणीव नाही. मातीतील कार्बनचे प्रमाण नष्ट होत आहे, ही चिंतनीय बाब आहे. त्यामुळे सेंद्रिय शेती ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले. कागल तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन व्हन्नूर (ता. कागल) येथील दौलतराव निकम माध्यमिक विद्यालयात सुरू आहे. या ठिकाणी 'पर्यावरणीय चिंता' या विषयावर त्यांचे व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी संजयसिंह चव्हाण होते.

सकाळ

# नॅनो सायन्सच्या दोन विद्यार्थ्यांची दक्षिण कोरियात पीएच.डी.साठी निवड



सौरभ थोरवत



प्रीती शिंदे

कोल्हापूर, ता. २० : शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी या अधिविभागातील सौरभ थोरवत (रा. मौजे कासारवाडा, राधानगरी), प्रीती शिंदे (रा. अचकनहळ्ळी, जत) यांची दक्षिण कोरिया येथील क्युंग ही आणि संक्युकवान युनिव्हर्सिटी येथे अप्लाइड फिजिक्स व केमिकल इंजिनिअरिंग याविषयातील पीएच.डी. संशोधनासाठी निवड झाली. त्यांना अधिविभागातील रसायनशास्त्राचे प्रा. डॉ. सुशीलकुमार जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. सौरभ, प्रीती यांनी सन २०१७ ते २०२२ या कालावधीमध्ये बीएस्सी -एमएससी नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी (पाच वर्षांचा एकात्मिक) अभ्यासक्रम पूर्ण केला आहे. पदवीपासून योग्य मार्गदर्शन मिळाल्याने आणि संशोधनाची आवड निर्माण झाल्याने आम्ही हे यश मिळवू शकलो, अशी प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र- कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, प्रभारी संचालक डॉ. किरण कुमार शर्मा आदींनी त्यांचे अभिनंदन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

21 JAN 2023
तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठात उद्यापासून कुस्ती स्पर्धा

## अ. भा. आंतरविद्यापीठातर्फे आयोजन : देशभरातील १७२ विद्यापीठातील १ हजार ९७९ मल्लांचा सहभाग

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील राजमाता जिजाऊ सभागृहात चार मॅटवर २२ ते २९ जानेवारी या कालावधीमध्ये आंतरविद्यापीठीय कुस्ती स्पर्धा होणार आहे. या राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत देशभरतील १७२ विद्यापीठातून १ हजार ९७९ मल्ल सहभागी होणार आहेत. अशी माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी पत्रकार परिषदेत दिली.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृतीशताब्दी वर्षानिमित्त आणि शिवाजी विद्यापीठाच्या हिरक महोत्सवनिमित्त विद्यापीठात अखिल भारतीय आंतरविद्यापीठीय कुस्ती स्पर्धा होणार आहे. कुस्ती स्पर्धेचे आयोजकत्व विद्यापीठाने स्वीकारत जय्यत तयारी केली आहे.

क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे म्हणाले, सोमवार २३ जानेवारी सायंकाळी ४ वाजता स्पर्धेचे उद्घाटन श्रीमंत शाहू छत्रपती यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आहेत. त्याचबरोबर हिंदकेसरी दिनानाथ सिंग, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, एआययुचे निरीक्षक डॉ. सुरेशकुमार मलिक यांची प्रमुख उपस्थिती आहे. पहिल्या दिवशी ५७, ६५, ७४, ८६ किलो वजनी गटातील सामने होणार आहेत.





२३ जानेवारीरोजी ६१, ७०, ७९, ९७ किलो वजनी गटाचे सामने होतील. २४ जानेवारी रोजी ९२ आणि १२५ किलो वजनी गटातील मल्लांचे सामने होतील. या १० वजनी गटात फ्री स्टाईल सामने होतील. या स्पर्धेचा बक्षिस समारंभ २४ जानेवारीला आहे.

ग्रिको रोमन स्पर्धा २७ ते २९ जानेवारी दरम्यान होतील. २७ जानेवारीला ५५, ६३, ७२, ८२ या वजनी गटातील स्पर्धा होतील. २८ जानेवारीला ६०, ६७, ७७, ९७ या वजनी गटातील सामने होणार आहेत. २९ जानेवारीला ८७ आणि १३० किलो वजनी गटातील सामने खेळवले जाणार आहेत. या स्पर्धेचा बक्षिस समारंभ २९ जानेवारीला सायंकाळी होईल. या स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी एकूण ५० पंचांची नियुक्ती केली. या स्पर्धेतून खेलो इंडिया स्पर्धेसाठी पहिल्या ८ खेळाडूंची निवड केली जाणार आहे. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलगुरू डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. अभिजीत वणिरे उपस्थित होते.

### विद्यापीठातील २० मल्ल

कोल्हापूर, सांगली, सातारा या जिल्ह्यातील २० मल्ल सहभागी होणार आहेत. एका जागेवर बसून सर्वांना कुस्ती स्पर्धा पाहता याव्या आणि सर्वांना गुण पाहता यावे यासाठी इलेक्ट्रॉनिक बोर्ड लावण्यात येणार आहे. सर्व सामने विद्यापीठाच्या शिववाहिनी या युट्युब चॅनेलवर दाखवले जाणार आहेत. सर्व मल्लांची राहण्याची व्यवस्था विद्यापीठांच्या वसतीगृहात आणि गेस्ट हाऊसमध्ये करण्यात आली आहे.

### कुस्ती स्पर्धेत कोणाचे वर्चस्व राहणार

देशभरातील कुस्ती स्पर्धेत हरियाणा, पंजाब, महाराष्ट्रातील मल्लांचे वर्चस्व असते. त्यामुळे शिवाजी विद्यापीठात होणाऱ्या कुस्ती स्पर्धेत कोणाचे वर्चस्व राहणार याकडे देशभरातील विद्यापीठाच्या नजरा लागल्या आहेत.